IMPACT FACTOR (SJIF) 2021 = 7.380 ISSN 2319-4766

AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2022, VOL - 10, ISSUE - 53

मुंबई विद्यापीठ संलग्नित

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे

आर. पी. गोगटे कला व विज्ञान आणि आर. व्ही. जोगळेकर

वाणिज्य महाविद्यालय, रत्नागिरी

आणि

मराठी समाजशास्त्र परिषद

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दिनांक 11-12 एप्रिल 2022

मराठी समाजशास्त्र परिषदेचे 31 वे राष्ट्रीय अधिवेशन

# भारतीय समाज आणि विकास प्रक्रिया

संयोजक

समाजशास्त्र विभाग

गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

मुख्य संपादक

डॉ. पी. पी. कुलकर्णी

प्राचार्य - गोगटे - जोगळेकर महाविद्यालय ,रत्नागिरी

संपादक

प्रा. शिवाजी अशोक उकरंडे

सहाय्यक प्राध्यापक

समाजशास्त्र विभाग गोगटे-जोगळेकर महाविद्यालय,रत्नागिरी



## RC 10

105 नांदेड जिल्ह्यातील भिल्ल जमातीवर शासनाच्या शैक्षणिक योजनांचा परिणाम : एक समाजशास्त्रीय अध्ययन 501-506
*डॉ. श्रीनिवास पिलगुलवार*

106 बंजारा जमातीचे ग्रामीण क्षेत्रातील बदलत्या जीवनशैलीचे समाजशास्त्रीय अध्ययन (सीमांतिक समुह) 507-513
*कु. गोदावरी विठ्ठल बन*

107 भारतातील जाती असहिष्णुता 514-516
*प्रा. डॉ. मेघराज रा. शिंदे*

108 महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती आणि समस्या 517-526
*डॉ. राजेंद्र फकिरा बगाटे*

109 गोंड आदिवासी महिलांचे राजकीय जीवन 527-531
*डॉ. फोले कविता भाऊराव आणि डॉ. भिसे आर. एम.*

110 पितृसत्ताक पद्धती आणि स्त्रियांच्या मानवी हक्कांचे हनन 532-537
*डॉ. साहेब विरभद्रराव पडलवार*

111 आदिवासी विकास आणि वर्जिततेचा प्रश्न : क्षेत्रिय अवलोकन 538-541
*बाबुराव जाधव आणि जी. एस. येळणे*

112 वृद्धांच्या सामाजिक समस्या – एक समाजशास्त्रीय अध्ययन 542-545
*डॉ. रविंद्र विठोबा विखार*

113 गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासीच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन 546-551
*प्रा. डॉ. विठ्ठल चव्हाण*

114 भारतीय समाजातील वृद्धांच्या समस्येचे विश्लेषणात्मक अध्ययन 552-555
*प्रा. धर्मदास वी. घोडेस्वार*

115 पूर्व विदर्भातील सिकलीगर भटक्या समुदायामधील कौटुंबिक-वैवाहिक अभिवृत्ती मधील परिवर्तन 556-559
*दिलीप जीवन रामटेके आणि डॉ. संजय कुंभारे*

116 भिल्ल जमातीतील वैवाहिक संस्कृतीचे समाजशास्त्रीय अध्ययन 560-564
*हरिदास जकू गावित*

117 भारतातील वृद्धांच्या समस्या: एक समाजशास्त्रीय अध्ययन 565-567
*प्रा. रामराव धेनू चव्हाण*

118 आदिवासी समुदायांच्या विविध समस्या आणि त्यांचे निराकरण (चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्याच्या संबंधात) 568-573
*डॉ. सोमा पी. गोंडाणे*

# गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासीच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. विठ्ठल चव्हाण**
*समाजशास्त्र विभाग प्रमुख, आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाई गंज जि. गडचिरोली*

## प्रस्तावना

भारताला स्वातंत्र्य मिळवून 75 वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे एकीकडे देशभर स्वातंत्र्याच्याअमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जल्लोष साजरा केला जात आहे, तर दुसरीकडे आदिवासी समाज शेकडो वर्षांपासून विकासापासून कोसो दूरचआहे. आदिवासी समाज भारतामध्येच नाही तर अमेरिका,दक्षिणआफ्रिका सारख्या देशातसुद्धा आदिवासी समाज आढळून येतो. भारतामध्ये एकूण लोकसंख्येच्या 8.6 टक्के पेक्षा अधिक आदिवासी जनसंख्या आहे भारतातील आदिवासी समाज वेगवेगळ्या जमाती मध्ये वर्गीकृत/वर्गीकरणकरण्यात आले आहे.

महाराष्ट्रात भिल्ल, गोंड, महादेव कोळी, ढोर कोळी, पावरा, ठाकूर, वारली,आंध, कोकणा, कोकणी, बंजारा,कोलाम, कोरकू यासारख्या एकूण 47 आदिम जमाती वास्तव्य करीत आहे. आदिवासी समाज एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करून तो भूप्रदेश क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रगत समाजाच्या तुलनेत लहान असतो. आदिवासी क्षेत्र इतर प्रगत समाजापासून दूर, अतिदुर्गम भागात, डोंगराळ प्रदेशात व घनदाट जंगलात डोंगराच्या पायथ्याशी वस्ती किंवा तांडाकरून राहत आहे.

इंग्रजी मधील 'Tribes' या शब्दाचा अर्थ जमात किंवा जमाती असे होतो. अगदी सुरुवातीपासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे लोक म्हणजे आदिवासी होय. डॉक्टर व्हेरीयरइल्विन व ठक्करबाप्पा यांनी आदिवासींना मूळचे रहिवासी असे संबोधले आहे. भारतीय संविधानातील कलम 342 (1)नुसार त्याचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादीत केला आहे म्हणून त्यांना आदिवासी जमाती असे म्हणतात.

खऱ्या अर्थाने धरतीला माता समजणारे आदिवासी जन्मभर नाचणारे गाणारेदणकट शरीराचे पण निरागस मनाची माणसे प्रगती किंवा विकासाकडे पहिले पाऊल टाकण्याआधी धार्मिक चालीरीती, मागासलेपणा, आर्थिक दुर्बलता,भूतप्रेत, देवी देवतांच्या उच्चाटनातून किंवा जंजाळातून बाहेर पडावे कि नाही या संभ्रमात वेळ घालवणारी माणस हि निसर्गपूजकनिसर्गाशी एकरूप झालेली भोळीभाबडीमाणसे गतिहीन व रूढीप्रिय समाज म्हणून ओळखला जातो.

शिलांगयेथे 1962 मध्ये जनजाती समितीच्या परिषदेने नुसार 'एक समान भाषा बोलणारा एका पूर्वजांपासून उत्पत्ती सांगणारा एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा, तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेला,रक्तसंबंधावर आधारित, सामाजिक व राजकीय प्रथांचे प्रामाणिकपणे पालन करणारा एकजिनसीसमूह म्हणजेच जनजाती होय.'

भारतातील सर्वच राज्यांमध्ये आदिवासी समाज आढळून येतो.2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या 8.87 टक्के म्हणजे एक कोटी पाच लाख एवढी होती. महाराष्ट्रातील विशेष करून सह्याद्री विभाग, सातपुडा विभाग, गोंडवन विभागात वेगवेगळ्या जमाती वास्तव्यास आहेत. विदर्भातील अमरावती जिल्ह्यात कोरकू, यवतमाळ जिल्ह्यात कोलाम, बंजारा चंद्रपूर गोंड, आंध, गडचिरोली जिल्ह्यात गोंड, माडिया गोंड, प्रधान, गोंड, हलबा, माना या जमाती राहत आहेत. स्वातंत्र्य प्राप्ती पासून आजपर्यंतचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की प्रगत समाजाशी आलेल्या संपर्कामुळे व शासनाच्या विविध कल्याणकारी योजना मुळे आदिवासींमध्ये मोठ्या प्रमाणात विकासात्मक बदल होत आहे. परंतु पारंपरिक संस्कृती, जीवन व निरक्षरता अज्ञानपणायामुळे या समाजाचा विकास मंदावलेला दिसून येतो.

## गडचिरोली जिल्ह्याची पार्श्वभूमी

गडचिरोली जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ या प्रदेशात मोडतो. फार प्राचीन काळी या प्रदेशावर राष्ट्रकूट यांचे राज्य होते. त्यानंतर चालुक्य देवगिरीचे यादव यांचे साम्राज्य निर्माण झाले. यानंतर गडचिरोलीच्या गोंड राजांनी